लोकमत ५-५-२०

# उत्तन डम्पिंग समस्येविरोधात राष्ट्रवादी आवाज उठवणार - खान



उत्तन येथे सिलिंडर दरवाढ, महागाईविरोधात भाजप सरकारचा निषेध करताना खासदार फौजिया खान, राष्ट्रवादीच्या पदाधिकारी पौर्णिमा काटकर, फ्रिडा मोरायस यांसह स्थानिक महिला उपस्थित होत्या.

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदरच्या उत्तन येथील महापालिकेच्या डम्पिंग ग्राऊंडची पाहणी करून नागरिकांच्या समस्यांवर संसद भवन व राज्याच्या विधिमंडळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आवाज उचलेल, असा इशारा खासदार फौजिया खान यांनी दिला आहे.

उत्तन नाका येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी फ्रिडा मोरायस यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटनासाठी त्या शनिवारी आल्या होत्या. त्यावेळी फ्रिडा यासह परिसरातील ग्रामस्थांनी पालिकेच्या डम्पिंगमुळे निर्माण झालेल्या समस्यांचा पाढाच वाचला. पालिकेने प्रक्रिया न करता बेकायदा कचऱ्याचा

- महापालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी फौजिया यांच्याशी संपर्क साधून साचलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासह शहरात लहान कचरा प्रकल्प सुरू झाले असून आणखी प्रकल्प सुरू होणार असल्याची माहिती दिली.
- तसेच ३० जूनपर्यंत उत्तन डम्पिंगमध्ये साचलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया पूर्ण केली जाईल, असे आश्वस्त केल्याचे फ्रिडा यांनी सांगितले.

डोंगर उभा केला आहे. त्याला सातत्याने आगी लागण्याच्या घटना घडून धुराचे साम्राज्य पसरत असते. शिवाय कचऱ्याची दुर्गंधी कायमची असल्याने परिसरातील नागरिकांना जगणे असह्य होऊन आजारांना सामोरे जावे लागत आहे. कचऱ्यातून निघणाऱ्या घातक लिचेटमुळे डोंगराखालील शेती नष्ट झाली असून पाणी प्रदूषित झाले आहे. तेच प्रदूषित पाणी समुद्रात जाऊन जलप्रदूषण होत असल्याचे मुद्दे फ्रिडा यांनी खान यांच्यासमोर मांडले.

परिसरातील डम्पिंगची समस्या ऐकून त्यांनी प्रत्यक्ष जाऊन परिस्थितीची पाहणी केली. त्यावेळी डोंगरी चर्चचे फादर ऑस्कर फर्नांडिस, फ्रिडा उपस्थित होते. या प्रकरणी संसदेत व महाराष्ट्र विधिमंडळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आवाज उठवेल, असे त्यांनी सांगितले.

---


# होर्डिंग्ज स्टँड अपघाताला कारणीभूत

## फलक, कमानींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची मागणी

← सकाळ ५-५-२०

विरार, ता. १२ (बातमीदार) : वसई-विरार महापालिका क्षेत्रात असलेल्या जाहिरात फलक व कमानींमुळे अपघाताची शक्यता असल्याने या फलक व कमानींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात यावे, अशी मागणी माजी स्थायी समिती सभापती तथा शिवसेना तालुका प्रमुख सुदेश चौधरी यांनी केली आहे.

वसई-विरार शहर महापालिका हद्दीत अनेक ठिकाणी जाहिरात फलक, होर्डिंग तसेच वेगवेगळ्या नागरी वस्त्यांत कमानी उभारण्यात आलेल्या आहेत. हे जाहिरात फलक, होर्डिंग तसेच उभारलेल्या कमानी या बऱ्याच वर्षांपासूनच्या आहेत. यातील बहुतांश कमानी या नगर परिषद काळापासूनच्या आहेत. त्यामुळे त्या जीर्ण झालेल्या आहेत. त्यांचे रॉडही तुटलेल्या अवस्थेत आहेत. मागील काही वर्षांत फलक व कमानी कोसळल्याने अनेक दुर्घटना घडलेल्या आहेत. त्यात जीवित व वित्तहानी झालेली आहे. त्यामुळे वसई-विरार शहरात अस्तित्वात असलेल्या फलक, होर्डिंग्ज व कमानींचे आरसीसी कन्सल्टंटच्या माध्यमातून तात्काळ स्ट्रक्चरल ऑडिट करून घ्यावे, अशी मागणी माजी स्थायी समिती सभापती सुदेश चौधरी यांनी आयुक्त पवार यांच्याकडे केली आहे.



विरार : शहरामध्ये ठिकठिकाणी फलक, होर्डिंग्ज व कमानी उभ्या असून त्यामुळे अपघातांना आमंत्रण मिळत आहे.

Scanned with CamScanner

सामना पा.नं. ५.

# पाच वर्षांनंतर लाल वादळ पुन्हा मुंबईच्या दिशेने

## शेतकऱ्यांच्या लाँगमार्चला दिंडोरीतून सुरुवात

मुंबई, दि. १२ (प्रतिनिधी) – शेतकरी, कष्टकरी जनतेच्या मागण्यांसाठी पाच वर्षापूर्वी मुंबईवर धडकलेले लाल वादळ पुन्हा मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, किसान सभा आणि इतर समविचारी संघटना एकत्र येऊन आजपासून नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी येथून लाँग मार्च सुरू झाले असून शेतकरी, कष्टकरी मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत. त्यामुळे सत्ताधाऱ्यांनी कापरं भरणार असल्याचे निश्चित झाले आहे.

शेतकरी गेल्या काही दिवसांपासून आपल्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करत असला तरी राज्य सरकार त्याकडे दुर्लक्ष करत आहे. याशिवाय आदिवासींच्या वनजमिनींच्या प्रश्नासंदर्भात माकपने आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यापार्श्वभूमीवरच सर्वसामान्याचा आवज न ऐकणाऱ्या सरकारला जाग आणण्यासाठी आजपासून नाशिक-मुंबई अशा लाँगमार्चला सुरूवात झाली आहे.

**मागण्या**

- शेतकरी कसत असलेली वन जमीन आदिवासी शेतकऱ्यांच्या नावावर करावी.
- शेतकऱ्याचा सातबारा कोरा करावा.
- कर्मचाऱ्यांच्या पेन्शन योजनेचा विषय निकाली काढावा.
- अवकाळी पावसामुळे हैराण झालेल्या शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यावा या प्रमुख मागण्यासाठी लाँगमार्च काढण्यात आला आहे.



***जनतेला जागृत करण्यासाठी लाँगमार्च***

*संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी हैराण आहे. काही दिवसांपूर्वी अवकाळी पाऊस झाला, कांद्याचे भाव गडगडला, द्राक्ष बाग देखील खराब झाल्या आहेत. कापूस आणि सोयाबीनचे भाव देखील कोलमडले आहेत. शेतकरी वर्ग वैतागलेला असून सरकार त्याची दखल घेत नसल्याचा आरोप माजी आमदार जे. पी. गावीत यांनी करतानाच जनतेला जागृत करण्यासाठी लाँगमार्च काढल्याचे त्यांनी सांगितले. सरकारी कार्यालयात आता कंत्राटी भरती केली जात आहे.*

पुण्यनगरी ५-पा-४.

# हिंदू जन आक्रोश मोर्चा

**मीरा रोड :** मीरा भाईंदरमध्ये सकल हिंदू समाजातर्फे लव्ह जिहाद आणि लँड जिहाद कायद्याची लवकर अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी रविवारी मोर्चा काढण्यात आला होता. यात हिंदुवादी संघटनेसह भाजप आणि मनसेचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. मीरा-भाईंदरच्या छत्रपती शिवाजी महाराज या मुख्य मार्गावर मोर्चा काढण्यात आला.

सध्या देशभर लव्ह जिहादची प्रकरणे वाढत आहेत. हिंदू मुलींचे धर्मांतर करून फसवणूक व शोषण होत आहे. तसेच हिंदूंच्या जागेवर बेकायदा कब्जा केला जात आहे. याविरोधात काही हिंदुत्ववादी संघटनांनी एकत्र येऊन सकल हिंदू समाजातर्फे मोर्चाचे आयोजन केले होते. यावेळी भाजप आ. नितेश राणे, आ. गीता जैन, माजी आ. नरेंद्र मेहता, पदाधिकारी, काजल हिंदुस्थानी आदी सहभागी झाले होते. सहभागी झालेल्या नागरिकांनी गळ्यात भगवे पट्टे, डोक्यावर भगवी टोपी परिधान केली होती.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी पृ.पा.४.

# ईडीचे बनावट समन्स पाठवणाऱ्या तिघांवर गुन्हा

**मीरा-भाईंदर येथील प्रकार**

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर शहरात काही महिन्यांपूर्वी केंद्रीय अन्वेषण यंत्रणा अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) एका बिल्डरला बनावट समन्स पाठवून खंडणी मागितल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. खंडणी मागणाऱ्या तिघांविरोधात काशिमीरा पोलीस ठाण्यात शुक्रवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मीरा-भाईंदरमधील सालासर बिल्डर्सचे संचालक आनंद अग्रवाल यांनी भाईंदर पोलीस ठाण्यात २२ जानेवारी २०२३ रोजी गौतम अग्रवाल, मितेश शाह आणि राजू शहा यांच्याविरोधात लेखी तक्रार दाखल केली होती. मितेश शहा नावाच्या त्यांच्या ओळखीच्या व्यक्तीने फोन करून ताबडतोब भेटण्याची विनंती केली, त्यानंतर मितेश शाह त्याच्या कार्यालयात आला आणि त्याला अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) त्याच्या नावाने पाठवलेले मूळ समन्स दाखवले आणि सांगितले की, लवकरच हे समन्स तुमच्या घरी पोहोचणार आहे. त्यावेळी आनंद अग्रवाल यांनी मितेशकडे त्या समन्सची मूळ प्रत मागितली. सुरुवातीला त्याने देण्यास नकार दिला, परंतु वारंवार विनंती केल्यानंतर त्याने आनंदला एक फोटो काढून पाठवला. ईडी चौकशीचे खोटे समन्स बनवून ते खरे आहे, असे भासवून आम्हाला न देता फक्त दाखवली. नंतर ईडी चौकशीची सेटलमेंट करण्यासाठी ५ लाख रुपये मितेश शहा याने मागून व गौतम अग्रवाल याचे आमच्याकडे सोल सेलिंगचे व्यवहाराचे पैसे बाकी नसताना, ते गौतम अग्रवाल यास ६.५ कोटी रुपये परत करा, असे सांगून खंडणी मागितली. आनंद अग्रवाल यांनी हे समन्स पाहिल्यानंतर त्यांना आश्चर्य वाटले की, त्यांच्या नावे ईडीचे आलेले समन्स यांच्याकडे कसे आले आणि का पाठवले. याची अधिकृत माहिती घेण्यासाठी आनंद यांनी ईडी समन्सवर असलेल्या पत्त्यावर एक मेल पाठवला. परंतु ईडीकडून कोणतीही माहिती त्यांना मिळाली नाही. काही दिवसांनंतर त्यांच्या बदनामीच्या बातम्या समाजमाध्यमातून येऊ लागल्या. काही दिवसांनी आनंद यांना ४ जानेवारी २०२३ रोजी ईडीचे मुंबईतील सहाय्यक संचालक रमेशकुमार कर्ण यांनी मेल पाठवून त्यांना कळवले की, कार्यालयातून त्यांच्या नावाने असे कोणतेही समन्स जारी करण्यात आलेले नाही. तुम्ही बनावट समन्स पाठवणाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करू शकता, असा मेल मिळाला. मग आनंद अग्रवाल यांनी भाईंदर पोलीस ठाण्यात जाऊन २२ जानेवारी २०२३ रोजी गौतम अग्रवाल, राजू शाह आणि सोशल मीडियावर व्हिडीओ करणाऱ्या इतरांविरुद्ध लेखी तक्रार दाखल केली. मात्र हे संपूर्ण प्रकरण काशिमीरा परिसरातील जमिनीशी संबंधित असल्याने पोलिसांनी पुढील तपासासाठी ते काशिमीरा पोलीस ठाण्यात वर्ग केले होते. त्यानंतर काशिमीरा पोलिसांनी पूर्ण तपास करून १० मार्च २०२३ रोजी गौतम अग्रवाल, मितेश शहा, राजू शहा यांच्याविरुद्ध विविध कलमांखाली काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

पुढारी पृ.पा.१.

# वसई ६९ गावांचा पाणीप्रश्न पेटणार

## विविध पक्ष-संघटनांचे आज धरणे आंदोलन

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

वसई-नालासोपारा- विरार महापालिका हद्दीत पिण्याच्या पाण्याची समस्या उग्ररूप धारण करू लागली आहे. त्यातच वसई-विरार महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासनप्रमुख अनिलकुमार पवार यांनी अनधिकृत नळजोडणी दंडनीय कारवाई करून अधिकृत करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर महापालिकेच्या क्षेत्रामध्ये सध्या नगररचना विभागाने ज्या इमारतींना बांधकाम पूर्णत्वाचा दाखला दिला आहे, त्या अधिकृत इमारतींमधील रहिवाशांना वसई-विरार महापालिका पिण्याचे पाणी नळाद्वारे देऊ शकत नाही, अशी परिस्थिती आहे. दुसऱ्या बाजूला ६९ गावांचे पाणी महापालिका बेकायदेशीरपणे शहरात वितरीत करीत आहे. यामुळे पाणीप्रश्न पेटणार अशीच स्थिती आहे. सत्ताधारी बहुजन विकास आघाडीचे राजकारण पुढील निवडणुकीपर्यंत सुरक्षित राहण्यासाठी आयुक्त अनिलकुमार पवार यांनी पालिका क्षेत्रातील अनधिकृत नळजोडण्या अधिकृत करण्याचा आदेश लागू केला आहे असे बोलले जात आहे. हा आदेश रद्द होण्याबरोबरच इतर मागण्यांबाबत सोमवारी पालिका मुख्यालयासमोर आंदोलन छेडण्यात येणार आहे. अनधिकृत नळजोडणी देण्यात सहभागी असलेल्या अधिकारी आणि तत्कालीन नगरसेवकांच्या विरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते मॅकेन्झी डाबरे व इतर सामाजिक संघटना धरणे आंदोलन करणार आहेत. याबाबत आंदोलनकर्त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, परिवहन सेवेच्या अभावामुळे पूर्व विभागातील रहिवासी रिक्षा किंवा खासगी वाहनावर अवलंबून राहावे लागते.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी पु - पा. ७.

# महामार्गावरील नैसर्गिक नाले मोकळे करा !

## खा. राजेंद्र गावितांचा प्रशासनाला इशारा

। नालासोपारा । मुंबई-अहमदाबाद महामार्गावर पावसाळ्यात साचणारे पाणी, त्यामुळे वाहनचालकांना निर्माण होणारा धोका, वाहतूक कोंडी आणि अपघातग्रस्तांना तत्काळ वैद्यकीय मदत मिळण्यासाठी पाच रुग्णवाहिका. ४० टन क्षमतेची क्रेन व महामार्गावरील अतिक्रमण हटवण्याचे आदेश दिले आहेत. एका आठवड्यात महामार्गावरील नैसर्गिक नाले आणि अतिक्रमणे न काढल्यास संबंधित अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचा इशारा खा. राजेंद्र गावित यांनी यावेळी दिला आहे.

पालघर जिल्ह्याचे शिवसेना खा. गावित यांनी मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील अपघात आणि वाहनकोंडीने होणाऱ्या अपघाताकडे गंभीरपणे लक्ष देऊन मीरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या मुख्यालयात पोलीस आयुक्त मधुकर पांडेय, अतिरिक्त पोलीस आयुक्त श्रीकांत पाठक, एनएचआयचे मुकुंद आतरडे, महामार्ग पोलीस उपायुक्त दहीकर, मीरा-भाईंदर महापालिकेचे संभाजी पानपट्टे, वसई-विरार शहर महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रमेश मनाले यांच्या उपस्थितीत बैठक घेतली.

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर घोडबंदर ते तलासरीपर्यंत एका वर्षाला ४५० जणांचा बळी जात आहे. अनेक अपघातग्रस्तांना वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे प्राण गमवावे लागले आहेत. तसेच एखाद्या अवजड



वाहनाचा अपघात झाल्यावर कमी क्षमतेची क्रेन असल्याने अपघातानंतर वाहतूक सुरळीत करण्यास विलंब होतो. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पाच रुग्णवाहिका व एक अग्निशमन दलाची गाडी, ४० टन क्षमतेची क्रेन उपलब्ध करावी, अशा सूचना गावित यांनी दिल्या.

पादचाऱ्यांना रस्ता ओलांडताना अपघात होऊन मृत्यूचे प्रमाण जास्त आहे. सूचना बोर्ड अल्प आहेत. राष्ट्रीय महामार्गावर एनएचएआयने ऑटोमॅटिक पेनल्टी सिस्टमचे कॅमेरे बसवले पाहिजेत. ज्यामध्ये वेगाने वाहने चालवणाऱ्यांवर तत्काळ गुन्हे दाखल झाले पाहिजेत. त्यामुळे वाहनचालकांत दहशत निर्माण होऊन ते वेगाने वाहन चालवणार नाहीत व पालघर जिल्ह्यातील अपघाती मृत्यूचे प्रमाण कमी करता येईल. अशा प्रकारे कॅमेरे मुंबई-पुणे एक्स्प्रेस हायवेवर, मुंबई-नाशिक महामार्ग व औरंगाबाद येथे बसवलेले आहेत. त्या धर्तीवर मुंबई-अहमदाबाद महामार्गावर बसवावे, महामार्गावरील कल्व्हर्ट साफ करावे, असे आदेश खा. गावित यांनी यावेळी दिले.

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर बनारसी तडकासमोर पावसाळ्यात पाणी साठते. आता पुलाचे काम पूर्ण होत आहे. कच्चे दरबारच्या बाजूचा नाला उंच झाला आहे, त्यामुळेच खाडीला पाणी जात नाही. पावसाचे पाणी रस्त्यावर साठून महामार्ग बंद पडतो. रस्त्याच्या कडेला असणाऱ्या हॉटेल मालकांनी पावसाच्या पाण्याचा निचरा होणारे गटार, नाले बंद केले आहेत. तसेच भराव टाकून उंच केले आहेत. त्यामुळे पावसाच्या पाण्याचा निचरा होत नाही. पावसाळ्यात पाणी हायवेवर तुंबते. जैन शिकंजी हॉटेल वालटण ढाबा, आरएमसी प्लांटमुळे प्रदूषण होत आहे.

## महामार्ग बंद पडल्यास गुन्हे दाखल करू – पांडेय

जैन शिकंजी हॉटेलसमोर नाला खोदणे, अंबिका पेट्रोल पंपासमोर पाणी साठत असल्याने या ठिकाणचा नाला खोल बनवून पाण्याचा निचरा होण्यासाठी गटार बनवणे, वॉल्टन हॉटेलसमोर पाणी साठत असल्याने या ठिकाणी नाला बनवून साठलेले पाणी खाडीत सोडणे. दुर्गा मंदिर व राधे काठियावाडी हॉटेलसमोर पाणी साठून वाहतूक कोंडी होते. यामुळे महामार्ग बंद होऊनसुद्धा वसई-विरार महापालिकेने आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने कोणतीच दखल न घेतल्याने मीरा-भाईंदर-वसई-विरार आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त मधुकर पांडेय यांनी अनधिकृत बांधकामे आणि नैसर्गिक नाले अतिक्रमणमुक्त करण्यासाठी जेवढा पोलीस बंदोबस्त पाहिजे, तो दिला जाईल, अशी ग्वाही खा. गावितांना दिली. महामार्ग बंद पडल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल करू, अशी ग्वाही पांडेय यांनी दिली.

Scanned with CamScanner

पुढारी ५.५.२०

# महामार्गावर अवजड वाहने ठरतायेत डोकेदुखी

## अतिभारमानाच्या वाहनांमुळे अपघातात वाढ

**खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**

वसई-विरार परिसरात विविध ठिकाणच्या रस्त्यावर क्षमतेपेक्षा अधिक माल भरून होत असलेली वाहतूक धोकादायक ठरत असून वाहतुकीचा फटका नागरिकांना बसू लागला आहे. अहमदाबाद महामार्गावर हीच अवजड वाहने वाहतूक कोंडीबरोबरच अपघातांनाही कारण ठरत असल्याने लहान वाहनचालकांची डोकेदुखी बनली आहे.

वसई विरार परिसरात सुरू असलेल्या विकासकामामुळे माती, दगड, राडारोडा, खडी, ग्रीड पावडरची भुकटी यासह इतर साहित्याची मागणी वाढली आहे. त्यामुळे याची महामार्ग व शहरातील इतर ठिकाणच्या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. मात्र काही वाहने ही क्षमतेपेक्षा अधिक माल भरून वाहतूक करू लागले आहेत. यावेळी वाहतुकीच्या नियमांचे पालन न करता उघड्याच अवस्थेत वाहतूक सुरू असते. अनेकदा त्यातून मोठ्या प्रमाणात



भुकटी व धूलिकण हवेद्वारे बाहेर उडतात याचा फटका त्याच्या मागून जाणाऱ्या वाहनचालकांना बसत आहे. विशेषतः दुचाकीवरून प्रवास करणाऱ्यांना याचा अधिक त्रास सहन करावा लागतो.

# विरारची वाहतूक कोंडी फुटेना

**वस : पुढारी वृत्तसेवा**

विरार शहरात वाहतूक व्यवस्थेवर ताण निर्माण होत असून शहरात प्रचंड कोंडीला सामोरे जावे लागते मात्र प्रशासक राजवटीत याकडे हव्या त्या प्रमाणात लक्ष दिले गेले नसल्याने याचा त्रास सर्वसामान्य नागरिकांसह अत्यावश्यक सेवांना देखील होत आहे.

एकीकडे कोंडी फुटत नसताना फेरीवाल्यांचे व अनधिकृतपणे रिक्षांचे जाळे देखील निर्माण होत असल्याने आम्ही चालायचे तरी कसे असा सवाल नागरीकातून उपस्थित होत आहे. विरार शहर हे मोठ्या प्रमाणात गजबजले आहे.. लोकसंख्या वाढल्याने त्यामानाने गर्दी ही दिवसे दिवस वाढतच आहे. नोकरी निमित्त मुंबई येथे प्रवास करत असतात. त्यांना नेहमीच वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.

# नालासोपा-यात शिवजयंती

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

नालासोपारा आयुर्वेद मेडिकल कॉलेजमध्ये तिथीनुसार शुक्रवारी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती खूप उत्साहाने साजरी केली गेली. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम, पोवाडा गायन तसेच निबंध स्पर्धा आणि शिवकाव्य वाचनाचा कार्यक्रम सुद्धा आयोजित केला होता.

शिवकाव्यवाचन स्पर्धेचा निकाल देताना परिक्षक नात्याने डॉ. ऋजुता ओमप्रकाश दूबे यांनी तृतीय वर्ष ची विद्यार्थिनी अलिशा डिसूझा यांचे नाव प्रथम विजेता म्हणून घोषित करून, सर्व विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रस्तुतींचे भरभरून कौतुक केले. त्यानंतर महाविद्यालयापासून ते अचोले रोड विठ्ठल मंदिर पर्यंत शिवगर्जना देत वाजंत्री सह शिवरायांची पालखी काढण्यात आली. महाविद्यालयाचे डायरेक्टर तसेच विद्यार्थ्यांचे प्रेरणास्थान असलेले



डॉक्टर ओमप्रकाश दुबे यांनी आपल्या भाषणामध्ये शिवरायांचे चरित्र सर्व विद्यार्थ्यांनी आचरणात आणावे असे आवाहन केले. आजच्या कार्यक्रमांमध्ये कॉलेज नियामक मंडळाचे सदस्य श्री नवलकिशोर मिश्रा यांनीही आपली उपस्थिती दर्शविली. महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी, अध्यापक, अध्यापके तर कर्मचारी, आंतरवासीय प्रशिक्षणार्थी हे सर्व कार्यक्रमाला व पालखी सोहळ्याला उपस्थित होते व ह्या संपुर्ण कार्यक्रमात सगळ्यांनी हिरिरीने भाग घेतला होता.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पा. नं. ४.

# सरकारी कर्मचारी उद्यापासून संपावर

## जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करण्याची मागणी; मुख्य सचिवांच्या बैठकीवर संघटनांचा बहिष्कार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**मुंबई :** राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसह शिक्षक व अन्य कर्मचाऱ्यांनी जुन्या निवृत्तिवेतन योजनेसह अन्य मागण्यांसाठी सोमवारी मध्यरात्रीपासून बेमुदत संप पुकारला असून मुख्य सचिवांनी तोडग्यासाठी सोमवारी बोलाविलेल्या बैठकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय संघटनांनी घेतला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे किंवा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठक बोलाविली, तरच पदाधिकारी बैठकीस जातील, असे महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे मुख्य सल्लागार ग. दि. कुलथे यांनी 'लोकसत्ता'ला सांगितले. कर्मचारी संघटनांच्या ताठर भूमिकेमुळे राज्य सरकारपुढे पेच निर्माण झाला आहे.

जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करण्याचा निर्णय राज्य सरकारने जाहीर केला, तरच तोडगा निघू शकतो. अन्यथा संपाच्या निर्णयावर आम्ही ठाम आहोत, असे कुलथे यांनी स्पष्ट केले. जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी या सर्व कर्मचारी संघटना संपात उतरणार असून मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांनी सुकाणू समितीला सोमवारी बैठकीस आमंत्रित केले होते. मात्र ही प्रशासकीय पातळीवरील बैठक असून जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करण्याचा अधिकार मुख्य सचिवांना नाही. त्यामुळे वेळकाढूपणा करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली असल्याची कर्मचारी संघटनांची भावना आहे. त्यामुळे मुख्य सचिवांच्या बैठकीस न जाण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे.

छत्तीसगढ, राजस्थान, पंजाब, हिमाचल प्रदेश आदी राज्यांनी जुनी निवृत्तिवेतन योजना स्वीकारली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातही ती स्वीकारण्याची कर्मचारी संघटनांची मागणी आहे. हा निर्णय घेतल्याने सरकारवर लगेच आर्थिक ताण येणार नाही, असे त्यांचे म्हणणे आहे.

जुनी निवृत्तिवेतन योजना स्वीकारल्यास २०३० नंतर राज्य सरकारवर मोठा आर्थिक बोजा पडेल. वेतन, निवृत्तिवेतन आणि कर्जावरील व्याजप्रदान हा निश्चित खर्च किंवा दायित्व ( कमिटेड एक्स्पेंडिचर ) ८३ टक्क्यांवर जाईल. विकास योजना आणि प्रकल्पांसाठी निधीच उरणार नाही. त्यामुळे घाईघाईने निर्णय घेता येणार नसून राज्यहिताचाही विचार दूरदृष्टी ठेवून करावा लागेल, अशी परखड भूमिका फडणवीस यांनी नुकतीच विधान परिषदेत मांडली आहे. त्यामुळे राज्य सरकार लगेच सोमवारी जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करण्याचा निर्णय घेण्याची शक्यता कमी आहे. त्यासाठी संघटनांनी सरकारला काही अवधी द्यावा आणि संप पुढे ढकलावा, अशी विनंती सरकारकडून केली जाण्याची शक्यता असल्याचे सूत्रांनी सांगितले.

### विरोधकांच्या पाठिंब्याने सरकारची कोंडी

विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असून सरकारी कर्मचारी सोमवारी मध्यरात्रीपासून बेमुदत संपावर गेल्यास अधिवेशन गुंडाळावे लागण्याची वेळ सरकारवर येणार आहे. हा संप मोडून काढण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या सेवांना अत्यावश्यक सेवा कायदा (मेस्मा) लागू करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यासाठी घाईघाईने विधानसभेत विधेयक मांडण्यात आले असून ते सोमवारी दोन्ही सभागृहांत मंजूर करण्याचे सरकारचे प्रयत्न आहेत. विरोधकांनी जुन्या निवृत्तिवेतन योजनेच्या कर्मचाऱ्यांच्या मागणीस पाठिंबा दिल्याने सत्ताधाऱ्यांची कोंडी झाली आहे. त्यामुळे संप तूर्तास कसा रद्द होईल आणि काही अवधी मिळेल, याचा प्रयत्न राज्य सरकारकडून सुरू आहे.

Scanned with CamScanner

लोकमत

# वाहन, मोबाइल चोर दुकलीला केली अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पोलिसांनी १० मार्चला वाहन आणि मोबाइल चोरी करणाऱ्या दोन आरोपींना अटक केले आहे. दोन्ही आरोपींकडून ९ गुन्ह्यांची उकल करून चोरीचे ५ मोबाइल, ३ दुचाकी आणि १ रिक्षा असा मुद्देमाल हस्तगत केल्याची माहिती शनिवारी जनसंपर्क अधिकारी सपोनि विशाल धायगुडे यांनी दिली आहे.

वसई-विरार परिसरात वाहन व मोबाइल चोरीच्या गुन्ह्यात दिवसेंदिवस वाढ होत असल्याने त्यावर आळा घालण्याकरिता व घडलेले गुन्हे उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठांनी सूचना व मार्गदर्शन केले होते. मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलिस निरीक्षक राहुल राख यांनी मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेतील अधिकारी व अंमलदार यांचे विशेष पथक तयार केले. १० मार्चला मिळालेल्या माहितीच्या आधारे एक जण आचोळे रोड येथील सनशाईन कमर्शियल कॉम्प्लेक्स समोर येथे चोरीचे मोबाइल फोन विक्रीसाठी येणार असल्याची बातमी मिळाली. तेथे सापळा रचून आरोपी गणेश पवार (२२) याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून ५ मोबाइल फोन हस्तगत केले.

तर एक जण चोरीच्या दुचाकी विक्रीसाठी काशिमिरा, घोडबंदर येथील रिलायन्स पॉवर हाउसच्या पाठीमागे येणार असल्याची बातमी मिळाली. तेथे सापळा रचून आरोपी कार्तिक भुजे (२३) याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून ३ दुचाकी व १ रिक्षा अशी एकूण ४ वाहने हस्तगत केली आहेत. ही कामगिरी पोलिस उपआयुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहायक पोलिस आयुक्त (गुन्हे) अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलिस निरीक्षक राहुल राख, सहायक पोलिस निरीक्षक दत्तात्रय सरक, पोलिस हवालदार अनिल नांगरे, जयकुमार राठोड, शिवाजी पाटील, राजाराम काळे, गोविंद केंद्रे, प्रवीणराज पवार, राजविर संधु, हनुमंत सूर्यवंशी यांनी केली.

Hello Vasai
Page No. 1 Mar 12, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# १० लाखांचे मांडूळ पकडले



नालासोपारा : ओस्तवाल नगरीच्या रिक्षा स्टॅण्डजवळील रस्त्यावर मंगळवारी रात्री पावणेनऊच्या सुमारास मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पोलिसांनी १० लाख रुपये किमतीचा मांडूळ जातीचा साप पकडला आहे. आरोपी फुरकान हसिनुद्दीन अन्सारी (२५) याने चीफ वाइड लाइफ व्हॉर्डन यांच्या परवानगीशिवाय मांडूळ बाळगला होता. औषधी पदार्थ व काळी जादू या कामासाठी विक्री करण्यासाठी आरोपीने हा मांडूळ जवळ बाळगल्याचे निदर्शनास आले. पोलिस हवालदार शिवाजी पाटील यांनी बुधवारी तुळींज पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 3 Mar 11, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# घरकाम करणाऱ्यानेच केले घर 'साफ'

## चोरीचा मुद्देमाल ताब्यात घेत अटक : तुळींज गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांना यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** घरात काम करणाऱ्या मुलानेच दुसऱ्या विधिसंघर्ष बालकाच्या मदतीने मालकाच्या घरातील सुमारे १५ तोळे दागिने चोरी करून घर 'साफ' केल्याची घटना उघड झाली आहे. तुळींज गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी चोरी करणाऱ्या आरोपीला १५ तोळ्यांच्या सोन्याच्या दागिन्यांसह अटक केली. चोरी केलेला मुद्देमाल हस्तगत केला असून, पोलिस पुढील तपास करत असल्याची माहिती पत्रकार परिषदेत वरिष्ठ पोलिस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांनी शुक्रवारी दिली आहे.



तुळींज गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी घरकाम करणाऱ्याला अटक केली असून त्याच्याकडून १५ तोळे सोन्याचे दागिने हस्तगत केले आहेत.

पिलाजी पाटील अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या सुनीती वेप्सी रीडर यांच्या घरी २८ फेब्रुवारीला दुपारी दीडच्या सुमारास चोरट्यांनी प्रवेश करत चार लाख ८९ हजारांचा माल चोरला होता.

तुळींजचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळाची पाहणी करून राहत्या घरी काम करणारा मुलगा उत्तम खंदारे याला चौकशीसाठी ताब्यात घेऊन विचारपूस केली असता तो असमाधानकारक, दिशाभूल करणारी उत्तरे देत होता. उत्तम व विधिसंघर्ष बालक यांच्याकडे तपास केला असता त्यांनी आपसात संगनमत करून दागिने चोरल्याचे उघड झाले. आरोपीकडून एकूण ४ लाख ५८ हजार ५६० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला.

### चौकशी टाळण्यासाठी त्याने केला आत्महत्येचा प्रयत्न

- पोलिसांच्या चौकशीचा ससेमिरा टाळण्याकरिता उत्तमने फिनेल पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न करून तपास प्रक्रियेत अडथळा आणण्याचा प्रयत्न केला होता.
- तांत्रिक विश्लेषणाद्वारे उत्तम हा गुन्हा घडलेल्या दिवशी विधिसंघर्ष बालक याच्या संपर्कात होता.

- ही कामगिरी पोलिस उपायुक्त सुहास बावचे, सहायक पोलिस आयुक्त डॉ. शशिकांत भोसले आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक मिथुन म्हात्रे, पोलिस उपनिरीक्षक बाळासाहेब यांदल, सहायक पोलिस उपनिरीक्षक शिवानंद सुतनासे, पोलिस हवालदार अनिल शिंदे, आनंद मोरे, उमेश वरठा, आशपाक जमादार, तडवी, पन्हाळकर, पांडुरंग केंदे, छबरीबन, राऊत यांनी केली आहे.



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner

पुढारी

## संक्षिप्त



# शौर्याची डेरवण युथ गेम्समध्ये 'सुवर्ण' हॅट्रिक

**ठाणे :** ठाण्याच्या युनिव्हर्सल हायस्कूलमध्ये इयत्ता आठवीत शिकणाऱ्या शौर्या अंबुरे हिने चिपळूणचे डेरवण गाजवले. श्री विठ्ठल राव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या वतीने ७ ते १० मार्च दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या नवव्या डेरवण युथ गेम्स ॲथलेटिक्स स्पर्धेत धावण्याच्या तीन वेगवेगळ्या स्पर्धेत शौर्याने सुवर्ण कामगिरीची हॅट्रिक केली. या सुवर्ण कामगिरीमुळे ती अंडर-१४ स्पर्धेत 'गोल्डन' धावपटू ठरली. या स्पर्धेतील विविध क्रीडा प्रकारात राज्यातील पाच हजार विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. शौर्या अंबुरे हिने अंडर- १४ च्या ६० मी., १०० मी. आणि १५० मीटर या तिन्ही धावणी स्पर्धेत जबरदस्त दौड करून सुवर्ण पदकांना गवसणी घातली. १०० मीटर धावणी स्पर्धा शौर्याने १२.७ सेकंदात पूर्ण करण्याची कामगिरी केली. या स्पर्धांमध्ये शौर्या सर्वाधिक वेगवान धावपटू ठरली. यापूर्वी तिने सीआयएससीई या राज्य स्तरीय व राष्ट्रीय स्पर्धेतही घवघवीत यश मिळवले होते. शौर्या हि ठाण्यातल्या एम स्पोर्ट्स ॲन्ड फिटनेस येथे डॉ.अजित कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते. शौर्या ही पोलीस उपायुक्त रूपाली अंबुरे आणि अविनाश अंबुरे यांची कन्या आहे.

My Thane Edition
Mar 13, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

Scanned with CamScanner